
ज्ञानगंगा घरोघरी

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

(महाराष्ट्र शासनाने वर्ष १९८९ मध्ये स्थापिलेले)
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२२२२
ई-मेल : kusumagrajchair@ycmou.ac.in

**डॉ. दिलीप धोंडगे**
प्रमुख
कुसुमाग्रज अध्यासन



**कुसुमाग्रज अध्यासन**

# अहवाल

मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त

**निबंध स्पर्धा**

**विषय :**

## सन २०२४ सालात मला आवडलेले पुस्तक



# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२

जावक क्र. : यचममुवि/KAC/2025/ दिनांक 25.01.2025

## परिपत्रक

### यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ,नाशिक मुख्यालयातील कायम शिक्षक व शैक्षणिक संयोजक यांच्यासाठी निबंध स्पर्धा

मा.कुलगुरू यांच्या आदेशानुसार आपल्या विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने 'सन २०२४ सालात मला आवडलेले पुस्तक ' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली आहे.पुस्तक मराठी भाषेतील असावे व निबंधही मराठी भाषेतूनच लिहावयाचा आहे. तज्ञ परीक्षकांकडून निबंधाचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या निबंधांना पारितोषिके दिली जातील. आपले निबंध कुसुमाग्रज अध्यासनाकडे दि.५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत द्यावेत. मराठी भाषा संवर्धन पंधरवाडाच्या निमित्ताने ही स्पर्धा आयोजित केली आहे.

(दिलीप भरड)
कुलसचिव

प्रत माहितीस्तव- मा. कुलगुरू कार्यालय
मा. प्र-कुलगुरू कार्यालय

प्रत : सर्व विद्याशाखा संचालक, विभाग, केंद्र, कक्ष व विभागीय केंद्र प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्यावे.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त
# निबंध स्पर्धा

**विषय :** "सन २०२४ सालात मला आवडलेले पुस्तक"
**आयोजक :** कुसुमाग्रज अध्यासन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**प्रस्तावना**
मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत कायम शिक्षक व शैक्षणिक संयोजक यांच्यासाठी *"सन २०२४ सालात मला आवडलेले पुस्तक"* या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा उद्देश विद्यापीठातील सहकाऱ्यांमध्ये वाचनाची आवड वाढविणे आणि मराठी भाषेत दर्जेदार लेखनाला प्रोत्साहन देणे हा होता.

**स्पर्धेचे तपशील**
स्पर्धेसाठी सादर होणारे पुस्तक मराठी भाषेतील असणे आवश्यक होते आणि निबंधही मराठीतच लिहिणे अपेक्षित होते. प्राप्त निबंधांचे परीक्षण प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. परीक्षकांनी सादर झालेल्या निबंधांमधील वैचारिक मांडणी, भाषाशैली आणि पुस्तकाच्या आशयाची सखोलता यावर विशेष भर दिला.

**विजेते**
या स्पर्धेत बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या शैक्षणिक संयोजक **डॉ. मंजुश्री श्रीपाद नेव्हल** यांनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यांनी *"प्रेरणादायी प्रवास एका हिरोचा – ओ. पी. मुंजाल यांच्या आयुष्यातून शिकण्यासारखे..."* या प्रिया कुमार लिखित आणि पराग पोतदार अनुवादित पुस्तकावर निबंध सादर केला होता.

**सत्कार सोहळा**
कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते डॉ. नेव्हल यांचा डॉ. तारा भवाळकर लिखित *"सीतायन"* हे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, तसेच विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**कार्यक्रमाचा समारोप**
या निबंध स्पर्धेच्या माध्यमातून मराठी भाषेत वाचन, चिंतन आणि अभिव्यक्ती यांना प्रोत्साहन मिळाले. वाचनसंस्कृती जपण्याचा आणि दर्जेदार साहित्याचा आस्वाद घेण्याचा संदेश पोहोचवून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# "Essay Competition
# on the Occasion of Marathi Language Fortnight"

Subject: **"The Book I Liked in the Year 2024"**
Organizer: **Kusumagraj Chair, Yashwantrao Chavan Maharashtra Open University**

## Introduction

On the occasion of Marathi Language Fortnight, the Kusumagraj Chair of Yashwantrao Chavan Maharashtra Open University organized an essay competition for permanent teachers and academic coordinators on the topic **"The Book I Liked in the Year 2024."** The objective of this competition was to cultivate a reading habit among the university colleagues and to encourage quality writing in the Marathi language.

## Competition Details

The book submitted for the competition had to be in Marathi, and the essay was also expected to be written in Marathi.
The evaluation of the received essays was carried out by Prof. Vijaykumar Paikrao. The judge gave special emphasis to the intellectual presentation, writing style, and depth of understanding of the book's content in the submitted essays.

## Winners

In this competition, Dr. Manjushri Shripad Nevhal, Academic Coordinator of the School of Multidisciplinary Studies, secured the first prize.
She had presented an essay on the book **"Prernadayi Pravas Eka Hirocha - O.P. Munjal Yanchya Ayushyatoon Shiknyasarkhe..."** (An Inspirational Journey of a Hero - Lessons from the Life of O.P. Munjal) written by Priya Kumar and translated by Parag Potdar.

## Felicitation Ceremony

Dr. Nevhal was felicitated by the Vice-Chancellor, Prof. Sanjeev Sonawane, who presented her with the book **"Seetayan"** written by Dr. Tara Bhavalkar.
On this occasion, the Head of the Kusumagraj Chair, Dr. Dilip Dhondge, Director of the School of Continuing Education, Dr. Jaydeep Nikam, as well as other university officials and staff, were present.

## Conclusion of the Program

Through this essay competition, reading, reflection, and expression in the Marathi language were encouraged.
The event successfully conveyed the message of preserving the reading culture and appreciating quality literature.

# फोटो







मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त '२०२४ सालात मला आवडलेले पुस्तक' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या शैक्षणिक संयोजक डॉ. मंजुश्री श्रीपाद नेव्हल यांना डॉ. तारा भवाळकर यांचे 'सीतायन'हे पुस्तक देऊन सत्कार करताना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर समवेत निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम सर आणि कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे सर.

YCMOU PRO PD S4 240325




नाशिक : डॉ. मंजुश्री नेव्हल यांना बक्षीस देताना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे. समवेत डॉ. दिलीप धोंडगे, डॉ. जयदीप निकम.

## पुस्तक स्पर्धेत डॉ. मंजुश्री नेव्हल प्रथम

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनातर्फे मराठी भाषासंवर्धन पंधरवड्यानिमित्त विद्यापीठ सहकाऱ्यांसाठी 'वर्ष २०२४ मधील मला आवडलेले पुस्तक' विषयावर निबंध स्पर्धेत बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या शैक्षणिक संयोजक डॉ. मंजुश्री नेव्हल यांनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यांनी 'प्रेरणादायी प्रवास एका हिरोचा ओ. पी. मुंजाल यांच्या आयुष्यातून शिकण्यासारखे' या प्रिया कुमार लिखित व पराग पोतदार अनुवादित पुस्तकावर निबंध सादर केला. प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी परीक्षण केले. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते डॉ. नेव्हल यांचा डॉ. तारा भवाळकर लिखित 'सीतायन' हे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे आणि निरंतर शिक्षण विद्याशाखाचे संचालक डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.

## डॉ. मंजुश्री नेव्हल प्रथम

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत डॉ. मंजुश्री श्रीपाद नेव्हल यांनी प्रथम क्रमांक मिळविला. परीक्षण प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते नेव्हल यांना गौरविण्यात आले. अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे आणि निरंतर शिक्षण विद्याशाखा संचालक डॉ. जयदीप निकम उपस्थित होते.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# महासागर
YCMOU PRO MSG P2 230325

➤ महत्त्वाचे

## 'मला आवडलेले पुस्तक' स्पर्धेत डॉ. मंजुश्री नेव्हल प्रथम

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्यानिमित्त विद्यापीठ सहकाऱ्यांसाठी 'सन २०२४ सालातील मला आवडलेले पुस्तक' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या शैक्षणिक संयोजक डॉ. मंजुश्री श्रीपाद नेव्हल यांनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यांनी 'प्रेरणादायी प्रवास एका



हिरोचा-ओ. पी. मुंजाल यांच्या आयुष्यातून शिकण्यासारखे...' या श्रीमती प्रिया कुमार लिखित व पराग पोतदार अनुवादित पुस्तकावर निबंध लिहिला होता. स्पर्धेतील निबंधांचे परीक्षण प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते डॉ. नेव्हल यांचा डॉ. तारा भवाळकर लिखित 'सीतायन' हे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, निरंतर शिक्षण विद्याशाखाचे संचालक डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कार्यक्रम सदस्य

| | | |
|---|---|---|
| **डॉ. दिलीप धोंडगे** | **:** | **अध्यासन प्रमुख** |
| **डॉ. विजयकुमार पाईकराव** | **:** | **निवड प्रमुख** |
| कु. ऋषिकेश गांगुर्डे | : | मदतनीस |

------------------------------------ **समाप्त** ------------------------------------